ISSN – 2277-7911
Impact Factor – 5.519

YOUNG RESEARCHER
A Multidisciplinary Peer-Reviewed Refereed Research Journal

July-Aug-Sept 2024
Vol. 13 No. 3

# बुद्धकालीन राज्ये, राजकीय परिस्थिती व राजकारण

**डॉ. किशोर महादेव खिलारे**

*सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यास केंद्र,*

*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर*

**Corresponding Author:** डॉ. किशोर महादेव खिलारे

**DOI - 10.5281/zenodo.14052519**

**प्रस्तावना:**

बुद्धकालीन राजकीय परिस्थिती संबंधीची माहीती वेगवेगळ्या वैदिक, पाली तसेच जैन साहित्यामध्ये विखुरलेल्या स्वरूपात आढळून येते. बुद्ध धर्माच्या उदय काळामध्ये भारतामध्ये कोणतीही सार्वभौम राज्यसत्ता अस्तित्त्वात नव्हती. (Rhys Davids, 2008,01) या काळामध्ये राजेशाही व गणराज्य शासनपध्दती हे दोन्ही प्रकार अस्तित्त्वात होते. असे असले तरी या कालखंडामध्ये राजेशाही व्यवस्था प्रबळ व बलशाली होती, तर गणराज्य व्यवस्थेचा हा पडता काळ होता. सुत्तपिटकातील अंगुत्तरनिकाय या ग्रंथात त्या काळात अस्तित्वात असलेल्या सोळा महाजनपदांचा उल्लेख, "यो इमेसं सोळासन्नं महाजनपदानं पहूतसत्तरतनान इस्सराधिपच्चं रज्जं कारेय्य, सेय्यथीदं - १) अंगान २) मगधांन ३) कासीनं ४)कोसलानं ५) वज्जीनं ६) मल्लानं ७) चेतीनं ८) वंसानं ९) कुरूनं १०) पांचालानं ११) मच्छानं १२) सूरसेनानं १३) अस्सकानं १४) अवंतीनं १५) गंधारानं १६) कबोजानं" असा आढळून येतो. हा उतारा अंगुत्तरनिकायामध्ये चार ठिकाणी आढळून येतो (कोसंबी,१९४०, २३) तसेच ललितविस्तार या बौद्धग्रंथामध्येही बुद्ध जन्मास येण्यापूर्वी या जंबुद्विपात (भारतात) निरनिराळी सोळा राज्ये होती असा उल्लेख आहे. पाणिनीचे अष्टाधायी, जैन साहित्य महाभारत इत्यादी साहित्यामध्ये प्राचीन भारतामध्ये अस्तित्वात असलेल्या गणराज्यांची माहिती मिळते. ललितविस्ताराच्या तिसऱ्या अध्यायात यासंबंधी माहिती आढळून येती ती सोळा महाजनपदे पुढीलप्रमाणे-

**अंग:**

अंगांचा देश मगधांच्या पूर्वेला होता त्याच्या उत्तर भागाला 'अंगुत्तराप' म्हणत. मगध देशाच्या राजाने अंग देश जिंकल्यामुळे तेथील महाजनसत्ताक पध्दती नष्ट झाली. आजच्या बिहार राज्यातील भागलपूर आणि मोंधीर या जिल्हयांचा प्रदेश अंग राज्यात समाविष्ठ होता. अंगच्या पूर्वेला चंपा व उत्तरेला गंगा नदी होती. चंपा नदी ही अंग व मगध या महाजनपदांमधील सरहद्द होती. (जातक क्र.- ५०६) चंपा हे अंगचे राजधानीचे शहर होते. गौतम बुद्ध या देशात धर्मोपदेश करण्यासाठी चंपा नगरीत - गग्गरा राणीने बांधलेल्या तलावाच्या काठी


मुक्कामाला राहत असत, असे त्रिपिटक ग्रंथातउल्लेख आढळतात.

**मगध:**

प्राचीन भारतातील सर्वात बलाढ्य व सामर्थ्यवान राज्य म्हणून मगध देशाचा उल्लेख केला जातो. हल्लीच्या बिहार राज्यातील पाटणा आणि गया जिल्हयात मगध राज्याचा समावेश होता. येथे एकसत्ताक राज्यपध्दती होती. बुद्धकाळात राजा बिंबिसार व त्यानंतर त्याचा पुत्र वैदेहीपुत्र अजातशत्रू हे येथील राजे होत. हे दोन्ही ही राजे गौतम बुध्दाचा व धम्मसंघाचा आदर करीत असत. त्यासंबंधीचे अनेक उल्लेख पाली धम्मग्रंथामध्ये आढळून येतात. उत्तरेस गंगा नदी, पश्चिमेस सूर्य नदी, दक्षिणेस छोटा नागपूर पठारावरील घनदाट अरण्य आणि पूर्वेस अंग राज्याची सीमा (अंग व मगध यांमधील सीमा; जातक क्र. ५०६) ही मगध राज्याची सरहद्द होती. राजगृह ही मगध देशाची राजधानी होती. बिंबिसार व अजातशत्रू यांच्या एकहाती सत्ता एकवटलेली असली तरी ती प्रजेला चांगली होती. बिंबिसार राजाने गोतम बुद्ध व त्यांच्या भिक्षूसंघाला राहण्यासाठी वेळुवन नावाचे उद्यान दिले होते. वैदेहीपुत्र अजातशत्रू ही गौतम बुद्ध तसेच इतर सर्वच श्रमणांचा आदर ठेवीत असे. दीघनिकायातील सामफल सुत्तामध्ये अजातशत्रू गौतम, बुद्धाच्या दर्शनाला गेल्याचा उल्लेख आहे.

**प्राचीन महाजनपदांचे भौगोलिक स्थान व राजकीय सीमा**

(इ.स. पूर्व ५००)




**कासी/काशी:**

प्राचीन भारतात बलवान व वैभशाली राज्य म्हणून काशीस ओळखले जाते. हे राज्य आजच्या बनारस शहराच्या आसपास पसरलेले असावे. वाराणसी ही कासीची राजधानी होती. वाराणसीतील अश्वसेन राजाच्या वामा राणीच्या उदरी पार्श्वनाथ-जैनांचा तेविसावा तीर्थंकर जन्मला. बुद्ध काळात या देषाचे स्वातंत्र्य पार नष्ट होऊन कोसल देशात त्याचा समावेश झाला होता. कासी राज्यास काशी असे ही संबोधले जाते. तेथील राजांना ब्रह्मदत्त म्हणत असत असे जातक अट्ठकथेवरुन दिसून येते. त्यांच्या राज्यपध्दतीसंबंधी फारशी माहिती सापडत नाही.(कोसंबी, १९४०,२८)

**कोसला:**

प्राचीन भारतातील सोळा महाजनपदामध्ये सामर्थ्यवान व पराक्रमी महाजन पद म्हणजे ''कोसल होय. प्रसेनजित राजाच्या कारकिर्दीत त्याचा विस्तार झाला. या राज्याच्या पूर्वेला दण्डक नदी, पश्चिमेला पांचालचे राज्य, दक्षिणेला सर्पिका नदी व उत्तरेला नेपाळच्या टेकड्या होत्या. उत्तर प्रदेशातील अवधच्या आसपासच्या प्रदेशात हे राज्य असावे. सावत्थी (श्रावस्थी) ही कोसलची राजधानी होती. श्रावस्थी हे शहर अचिरवती (सध्या राबत्ती) नदीच्या काठी होते. गौतम बुध्दांनी श्रावस्थी येथील अनाथ पिंडकाच्या जेतवन विहारातून केलेल्या उपदेशांचे उल्लेख त्रिपीटक ग्रंथामध्ये अनेक ठिकाणी आढळतात. कोसल राजा प्रसेनजित यास गौतम बुद्धांनी केलेला उपदेश कोसल संयुत्त या भागात आढळतो. ललित विस्तारातील या राजवंशाच्या वर्णनावरुन ते मातंग या जातीतून उदयाला आलेले दिसतात व त्यास धम्मपद अट्ठकथेत सापडणाऱ्या विड्डूभाच्या गोष्टीवरुन बळकटी येते.(कोसंबी, १९४०,३०)

**वज्जी:**

आजच्या बिहार राज्याच्या उत्तर भागात वज्जी हे आठ किंवा नऊ गणराज्याचे राज्य होते. या गणराज्यामध्ये विदेह, ज्ञातृक व वज्जी या महत्त्वाच्या राज्यांचा समावेश होता. मिथिला ही विदेह या राज्याची राजधानी होती. त्रिपिटक ग्रंथामध्ये अनेक ठिकाणी लिच्छिवी या गणराज्याची राजधानी होती. वज्जी आपल्या एकीने व पराक्रमाने बुद्धांच्या हयातीत स्वतंत्र राहील्यामुळे बुध्दाला त्याच्याविषयी आदर असणे साहजिक होते. महापरिनिब्बाणसुत्तात भगवान दुरून येणाऱ्या लिच्छिवींकडे पाहून भगवान म्हणतात, 'भिक्षूंनो, ज्यांनी तावत्रिंशत देव पाहीले नसतील, त्यांनी या लिच्छिवींच्या समुदायाकडे पहावे!' (कोसंबी, १९४०,३१) बुद्ध भगवन्ताने वज्जींना अभिवृध्दीचे सात नियम उपदेषिल्याचे वर्णन महापरिनिब्बाण सूत्ताच्या आरंभी आणि अंगुत्तरनिकायाच्या सत्तकनिपातात सापडते.

**मल्ला:**

प्राचीन भारतातील राजकीय जीवनात महत्त्वाचे स्थान प्राप्त केलेले मल्ल हे एक राज्य होते. मल्लांचे राज्य वज्जीच्या पूर्वेस व कोसल देशाच्या पश्चिमेस होते. तेथे तेथे वज्जीप्रमाणेच गणसत्ताक राज्यपध्दती प्रचलित होते. एका विभागाची कुशिनारा व दुसऱ्या विभागाची पावा ही राजधानी होती. सध्याच्या उत्तर प्रदेशातील गोरखपूर जिल्ह्यात असलेले कसिया हेच कुशिनारा असावे व त्याच्या आग्नेयेस असलेले फाजलपूर हेच पावा शहर असावे असे मानले जाते. गौतम बुद्धांनी अखेरचे भोजन पावा नगरीत चुंद कम्मारपुत्त यांच्याकडे घेतले व कुसिनारा येथे त्यांचे महापरिनिर्वाण झाले. (महापरिनिब्बाणसुत्त, दीघ.-२)

**चेती (चेदि):**

या राष्ट्राची माहिती जातकातील चेतिय जातक आणि वेस्संतर जातक या दोन जातकांत आली आहे. बुंदेलखंडाचा दक्षिण प्रदेश व जबलपूर रेवाचा उत्तर प्रदेष या दरम्यान हे राज्य पसरले होते. त्याची राजधानी सोत्थिवती (स्वस्तिवती) होती असे

चेतिय जातकात (जातक क्र- ४२२) म्हटले आहे. बुद्धकाळी शिवीचें व चेतीचें नांव अस्तित्वात होते परंतु, बुध्द भगवंताच्या चरित्राषी या राज्यांचा कोणताही संबंध आला नाही (कोसंबी, १९४०,३३)

**वंसाः**

गौतम बुद्धांच्या कालखंडामध्ये या राज्याचा राजा 'उदेना' होता. याची राजधानी कोसम्बी (कौशाम्बी) होती. बु  समकाली येथील गणसत्ताक राज्यपध्दती नष्ट झाली. (कोसंबी, १९४०,३४) उदयन राजा प्रारंभी बौद्ध धर्माच्या विरोधी होता तथापि बौद्ध भिक्षू पिंडोल भारद्वाज यांच्या उपदेषानंतर त्याने त्यांचे शिष्यत्व स्विकारले.(कोसंबी, २००७,१५१-१५४) कौशाम्बी येथे घोषित, कुक्कूट आणि पावारिक या तीन श्रेष्ठींनी बुद्धाच्या भिक्षू संघाला राहाण्यासाठी अनुक्रमे घोषिताराम, कुक्कूराम आणि पावारिकाराम असे तीन विहार बांधल्याचा उल्लेख अंगुत्तरनिकायाच्या अठ्ठकथेत व धम्मपद अठ्ठकथेत सापडतो.

**कुरूः**

कुरू हे राज्य आजच्या दिल्ली व मीरत जिल्ह्याच्या प्रदेशात पसरलेले असावे. या देशाची राजधानी इन्द्रप्रस्थ ही होती. बु  समकाली तेथे कौरव्य नावाचा राजा राज्य करीत असे परतु; तेथील राज्यव्यवस्थेविषयी कोणतीही माहीती उपलब्ध नाही. या देशात बुद्धांच्या भिक्षूसंघासाठी एक देखील विहार नव्हता. कुरू देशातील राष्ट्रपाल हा धनाढ्य तरूण भिक्षू झाल्याची कथा मज्झिमनिकायात विस्तारपूर्वक देण्यात आली आहे.

**पांचाल (पांचाला):**

महाजनपदापैकी कुरू राज्याच्या पूर्वे व मत्स्यांच्या उत्तरेस हे राज्य होते. आजचा रोहिलाखंड असलेल्या भागात हे राज्य होते. याचे दक्षिण व उत्तर असे दोन भाग होते. त्याच्य राजधान्या कापील्य व अहिच्छत्तक या दोन होत्या. (राजवाडे, २००३,१७२) इ. स. पूर्व सहाव्या शतकाच्या सुमारास येथे प्रजासत्ताक शासनपध्दतीची स्थापना झाली.

**मच्छा (मत्स्या):**

हे महाजनपद कुरू राज्याच्या दक्षिणेला व यमुना नदीच्या पष्चिमेला होते. इ. स. पूर्व ६ व्या शतकाच्या राजकीय जीवनात मत्स्य या महाजनपदाला विषेशमहत्त्व असल्याचे दिसत नाही. आजच्या राजस्थानमधील जयपूर, भरतपूर, आल्वर व आसपासचा प्रदेश मत्स्य राज्यात समाविष्ठ झालेला असावा. विराटनगर व बैसा ही राजकीयदृष्ट्या दोन महत्त्वाची शहरे होती.

**शूरसेना (सूरसेना):**

कुरू राज्याच्या दक्षिणेला व चेदि राज्याच्या पश्चिमेला हे राज्य होते. मथुरा (मधुरा) ही या राज्याची राजधानी होती. येथे अवंतिपुत्र नावाचा राजा राज्य करीत होता. येथील शूरसेन राजा गोतम बुद्धांचा समकालीन असावा. वर्णाश्रमधर्मासंबंधाने अवंतिपुत्र व महाकात्यायानाचा संवाद मज्झिमनिकायातील मधुरसुत्तात वर्णिला आहे. या देषात गौतम बुद्ध क्वचितच जात असत.

**अस्सका (अश्मका, अश्मक, अश्वक):**

सुत्तनिपातातील पारायणवग्गाच्या आरंभी ज्या वत्थुकथा आहेत, त्याजवरून असे दिसून येते की, अस्सकांसचे राज्य गोदावरी नदीच्या काठावर वसलेले होते. या राज्याची विषेष माहीती बौ वाङ्य्ःमयात सापडत नाही. तथपि बुद्धाची किर्ती येथवर जावून थडकली होती. ती ऐकून बावरीने आपल्या सोळा शिष्यांना बुद्धांच्या दर्शनासाठी पाठविले होते.(कोसंबी, १९४०, ३८-३९) कौटिल्याचा भाष्यकार 'भटस्वामिन' याने अश्मक म्हणजे महाराष्ट्र असे म्हटले आहे. पोटली (Potali) ही या राज्याची राजधानी होती.

**अवंती:**

बुद्धकाळामध्ये भारतात वत्स, कोसल आणि मगध या बलाढ्य राज्यांबरोबर अवंतीचा उल्लेख केला जातो. अवंतीची राजधानी उज्जयिनी होती. (Rhys Davis, [2008], 03) परंतु, महिस्सती (महिष्यती) ही प्रथम कालखंडामध्ये याची राजधानी असावी. येथे चंडप्रद्योत राजा राज्य करीत होता. प्रद्योत हा राजा बौद्ध धम्माचा उपासक होता. अवंती हे एक बौद्ध धम्माचे प्रमुख केंद्र होते.

**गंधारा (गांधारा):**

गंधार या राज्याची तक्षशिला ही राजधानी होती. इ. स. पूर्व सहाव्या शतकात गंधारच्या प्रदेशात 'पुष्करसारिन' नावाचा राजा राज्य करीत होता. या राजास पुक्कुसाति म्हणूनही ओळखले जाते. हल्लीच्या कंदहार प्रदेशामध्ये हे राज्य पसरले होते. पुक्कुसाति राजाने उतार वयामध्ये आपले राज्य सोडले व राजगृहापर्यंत पायी प्रवास करून भिक्खूसंघामध्येप्रवेश केला. त्याचे आणि बिंबिसार राजाचे मित्रत्वाचे संबंध होते. प्राचीन भारतातील तक्षशिला विद्यापीठ या राज्यातच होते.

**कंबोजा (काम्बोजा):**

आधुनिक पाकिस्तानातील हजारा जिल्हा व वायव्य सरहद्द प्रांतातील काफिरिस्थानचा काही भाग म्हणजेच प्राचीन काळातील हे कंबोजचे राज्य असावे. हे राज्य गंधारच्या शेजारीच होते. मझ्झिमनिकायातील अस्सलायन सुत्तात 'योनकंबोजेसु' असा त्या देषाचा यवनांबरोबर उल्लेख केला आहे. या राज्याची द्वारका ही राजधानी होती.

**इतर राज्ये:**

या सोळा राज्याषिवाय इतर राज्यांची माहिती अंगुत्तरनिकाय व दीघनिकाय या ग्रंथामध्ये मिळते. दीघनिकाय ग्रंथाच्या महापरिनिब्बाणसूत्तामध्ये शाक्य, बुली, कोलीय, मोरिय, कालाम या राज्यांचा उल्लेख आढळतो. या राज्यांमध्ये गणराज्यव्यवस्था प्रचलित होती. त्याचबरोबर कलिंगा आणि वैदीहा या राजेशाही असलेल्या राज्यांचा उल्लेख कुंभग्राम या जातक कथेत आढळतो. या राज्यासंबंधींची सविस्तर माहिती बौद्ध वाङ्ःमयामध्ये आढळून येत नाही.(Khongchinda, [1986], 88)

**शाक्य-** शाक्य वंशीयांचे दक्षिण भारतातील हे एक महत्त्वाचे गणराज्य होते. गौतम बुद्धांचा जन्म या गणराज्यामध्ये झाला. कपिलावस्तू हे या राज्याच्या राजधानीचे ठिकाण होते. ते नेपाळच्या सीमेवर होते. ते बनारसपासून शंभर मैल दूर होते

**कोलिय-** कोलिय गणराज्य शाक्यांच्या पूर्वेस होते रोहिणी नदी दोन्ही राज्यांच्या मधून वाहत होती व ती या दोन्ही देशांची सीमारेषा होती. शाक्य आणि कोलिय यांच्यामध्ये विवाह संबंध होते त्यामुळे दोन्ही देशांचे संबंध जवळचे होते

**भागा-** ऐतरिय ब्राह्मण ग्रंथामध्ये प्राचीन भागा वंशीयांचा उल्लेख आढळतो. या राज्याचे स्थान सध्याच्या मिर्झापूर जिल्ह्यात असावे.

**मोरिया-** पिपलीवन या राज्याची राजधानी होती परंतु त्याविषयी मतभेद आहेत. शाक्य राज्याचाच हा एक भाग असावा असेही मत मांडले जाते. येथे मोरांचे प्रमाण जास्त होते. त्यामुळे या राज्यास मोरिय म्हणून ओळखले जात असे.

**बुली-** या विषयी सविस्तर माहिती उपलब्ध नाही. ते वेथदिपा या राज्याच्या जवळ वसलेले होते. आधुनिक शहाबाद व मुझफ्फरपूरच्यामध्ये असावे असा अंदाज लावता येतो.

**कलाम-** या राज्याच्या मुख्य राजधानीविषयी अनिश्चितता आहे. बुद्धांचे एक शिक्षक अलारा या जमातीतील होते.

या लहान राज्यांच्या राज्यपध्दताचे स्वरूप लक्षात घेता असे दिसून येते की, ते लोकशाही गणराज्य व्यवस्थेसारखे असले तरी प्रत्यक्षात मात्र अल्पजनसत्ताक असल्याचे दिसते. कारण त्यांची निर्णयशक्ती लहान गटसमूहामध्ये केंद्रीत होती. बहुसंख्यांक लोकांच्यामध्ये नव्हे बुद्धकालामध्ये प्रारंभी सर्वसाधारणपणे दोन प्रकारच्या राज्यव्यवस्था अस्तित्वात होत्या. त्यातील पहिला प्रकार म्हणजे अल्पजनांच्या हातात राजकीय सत्ता असलेल्या गणराज्यांचा होता. आधुनिक राज्यशास्त्राच्या परिभाषेत त्याला महाजनसत्ता (Aristocracy) म्हणता येईल. या महाजनांनाच त्या काळी राजे मानले जात असे. त्यांच्या अध्यक्षाला महाराजा मानले जात असे. ह्या प्रकारात वज्जी गणराज्य सर्वात मोठे होते. कारण त्यात मल्ल, सकिय, कोलीय, मग्ग इत्यादी आठ राज्यांचा समावेश होता. उपरोक्त सोळा महाजनपदामध्ये शाक्य गणराज्याचा उल्लेख नाही कारण ही यादी तयार होण्यापूर्वीच शाक्यांचे स्वातंत्र्य नष्ट होऊन त्यांचा समावेश कोसल राज्यात झाला होता. हे कोसल कुल मातंगच्युत्युत्पन्न असल्याचे ललितविस्तारात म्हटलेले आहे. त्यावरून ते मातंग किंवा मांगांच्या टोळयातून उदयाला आलेले असावे असे मत धर्मानंद कोसंबी यांनी नोंदवून ठेवले आहे(कसबे, २००८,२५६)

**बुद्धकालीन राजकीय घडामोडी व राजकारण:**

राजांची लहान लहान राज्ये व राजेहीन भिन्न भिन्न गणसंस्था असे बुद्धकालीन समाजसंस्थेचे राजकीय स्वरूप होते. सार्वभौम सत्तेचा अभाव असल्यामुळे राज्यांत आपसात वैराग्नी नित्य धुमसत असे. निर्बळ झालेल्या शेजारच्या राज्याला गिळण्याकरता दुसरे सबळ राज्य नेहमी टपलेले असे. एकमेकांच्या विरूध्द कारस्थाने करण्यात सर्व गुंतलेली असत. त्यामुळे सर्व राज्यसंस्था एक प्रकारे नित्य युध्दमान अवस्थेत अस्वस्थपणे गुंतलेली होती. गणसंस्था अनेक होत्या. त्यांच्यात गटबाजी माजून अव्यवस्था व

बेबंदशाही खिळलेल्या रोगाप्रमाणे सामाजिक जीवनास जर्जर करीत होती. (जोशी, १९७२,३८२) उपरोक्त १६ राज्यापैकी मगधा, कोसल, अवन्ती, वंसा आणि लिच्छिवी किंवा वज्जी ही बुध्दकालीन बलाढ्य व शक्तीशाली राज्ये होती. मगधा, कोसल या राज्यामध्ये राजेशाही तर लिच्छवी राज्यामध्ये गणराज्य व्यवस्था अस्तित्वात होती. यातील काही राज्ये दुसऱ्या राज्यांचे मांडलिक होते तर काही राज्ये स्वतंत्र होती.

राजकीय दृष्टिकोनातून विचार करता हा काळ गणसत्ताक राज्यांच्या पडझडीचा तर प्रबळ एकसत्ताक राजेशाहीच्या उदयाचा कालखंड असल्याचे दिसून येते. या कालखंडामध्ये महत्त्वाकांक्षी राज्यकर्त्यांनी आप-आपल्या राज्यांच्या सीमा वाढविण्याच्या लालसेतून युद्धाचा मार्ग अवलंबल्याचे दिसून येते कोसल राजसत्तेने आपले बाहू गोमतीपासून छोट्या गंडकपर्यंत आणि नेपाळच्या तराईपासून गंगेपर्यंतकदाचित पसरलेल्या व्यापक प्रदेशात, एवढेच नव्हे, तर बहुधा कैमूर रांगांच्या पूर्वभागातही पसरले होते. ह्या राज्याच्या मांडलिकात निःसंशय काशी, शाक्य आणि कालाम ह्यांच्या राज्यकर्त्यांसह अनेक राजांची गणना होत असे.(रायचौधुरी, १९७२,१९०) यावरून राज्याराज्यांमधील सीमाविस्ताराची सत्तास्पर्धा किती तीव्र होती याची कल्पना येते.

उदयनाच्या काळात अवंतीच्या गादीवर चंडप्रद्योत महासेनाची सत्ता होती व त्याची कन्या वासवदत्ता ही वत्सराजाची पट्टराणी होती. प्रद्योत क्रूर होता, असे 'महावग्गा'त त्याच्या स्वभावाविषयी म्हटले आहे. तो 'नयवर्जित' म्हणजे चांगल्या प्रकारचे राजकीय धोरण नसलेला आहे, अशी पुराणे टीका करतात आणि 'खरोखर तो शेजारच्या राजांना नमवील'- ('स वै प्रणतसामन्तः') अशीपुस्ती जोडतात. एके प्रसंगी त्याने वत्सराजाला कैद केले होते व मथुरेच्या सत्तेशी त्याचे घनिष्ठ संबंध होते शेजाऱ्यांवर त्याने जी जरब निर्माण केली होती, तिची कल्पना 'मज्झिमनिकाया'तील एका विधानावरून येते. आपल्या प्रदेशावर प्रद्योतचे आक्रमण होईल, ह्या भीतीने बिंबिसाराचा पुत्र अजातशत्रू ह्याने राजगृहाभोवती तंटबंदी केली होती, असे त्यात म्हटले आहे. तक्षशिलेचा राजा पुष्करसारिन् ह्याच्या विरूध्द त्याने युध्दही पुकारले होते. बिंबिसाराच्या हयातीत राजगृहावर हल्ला करण्यासाठी प्रद्योत राजा पुढे सरसावला होता, असे जैन आख्यायिका सांगते.(रायचौधुरी, १९७२,१९३-१९४) कोसल व मगध ही त्याकाळातील शक्तीशाली राज्ये होती. या राज्यांमध्येही अनेकदा युध्द झाल्याचे संदर्भ मिळतात. कोसल व वज्जी ह्यांच्यामध्ये झालेल्या युध्दाचा परिणाम म्हणून वैशाली व काशीचा निदान काही भाग हे मगधात विलीन झाले व बहुदा त्यामंळेच मगधाचा महत्त्वाकांक्षी राजा आणि अवंतीचा तितकाच महत्त्वकांक्षी आधिपती एकमेकांच्या समोर उभे ठाकले.(कित्ता, १९९) शाक्य व कोलीय या राज्यांमध्येही रोहिणी नदीच्या पाणीवाटपावरून युध्दजन्य परिस्थिती निर्माण झाल्याची माहिती जातकअट्ठकथेत व अत्तदण्डसूत्तामध्ये आढळून येते. या युध्दास गौतम बुध्दांचा विरोध होता.

याच कालखंडामध्ये राजपदाच्या प्राप्तीसाठी कपटनीती आणि विश्वासघात यांचा वापर झाल्याचे दिसून येते. अजातशत्रू राजाने आपला पिता राजा बिंबिंसार यांची हत्या करून राजपद मिळविले होते.(कोसंबी, १९४०, २७) बिंबिसाराच्या मृत्यूमुळे शोकग्रस्त झालेल्या त्याच्या कोसलकन्या राणीने देहत्याग केला. या घटनेमुळे कोसल राजा अजातशत्रूचा कट्टर शत्रू बनला व पुढे त्यांच्यामध्ये वारंवार लढाया घडून आल्याचे दिसून येते. (परांजपे, २०१०,५५) अजातशत्रूही आपल्या या कृत्याने अस्वस्थ होता, आपल्या मुलाकडून आपली हत्या होईल किंवा कोणीतरी आपला विश्वासघात करेल अशी भीती त्याच्या मनामध्ये सतत घर करून असल्याचे हे बुद्धांच्या एका भेटीप्रसंगावरून दिसून येते जीवक कौमारभृत्य एके प्रसंगी अजातशत्रू राजास बुध्दाच्या दर्षनासाठी घेवून गेला असता, बुद्धसंघातील निरव शांतता पाहून अजातशत्रू जीवकास म्हणतो, ''सौम्य जीवक! मला तूं फसवीत तर नाहीसना? माझ्या शत्रूच्या हाती देण्यासाठी मला येथे आणले नाहीस ना? साडेबाराशे भिक्षूंचा संघ येथे रहात असतां एकाचा देखील बोलण्या चालण्याचा शब्द ऐकू येत नाही, हे मोठे आश्चर्य नव्हे काय?'' पुढे भिक्षू संघाची शांत आणि गंभीर चर्या पाहून अजातशत्रू राजा म्हणतो, ''माझा उदायीभद्रकुमार कुमार अशा प्रकारच्या शांतीने संपन्न होवो!''(कोसंबी, १९४०,२८६-२८७) अजातशत्रू व प्रसेनजित यांच्यामध्ये वारंवार लढाया घडून येत असतानाच प्रसेनजिताचा पुत्र विड्डूभ याने बंडाळी करून आपल्या बापाला राज्याबाहेर जायला भाग पाडले.

**संदर्भसूची:**

१) ''विनय-पिटक'', (२००६) अनुवादक- सांकृत्यायन राहुल, त्रिपिटक प्रकाशन प्रतिष्ठान, नागपूर.

२) ''दीघनिकाय भाग-१'', (द्वितीय आवृत्ती, मे, १९९९), अनुवादक- राजवाडे चिं. वै., इंटरनॅशनल सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज्.

३) ''दीघनिकाय भाग-२'', (द्वितीय आवृत्ती, एप्रिल, २००३), अनुवादक- राजवाडे चिं. वै., इंटरनॅशनल सेंटर फॉर बुद्धिस्ट स्टडीज्.

४) ''दिघनिकाय- भाग- 1'', (१९८८), अनुवादक- धावरे वसंत, सुगावा प्रकाशन, पुणे.

५) ''सिध्दार्थ जातक, खंड-३'', (जानेवारी, १९९७), संपादिका- भागवत दुर्गा, वरदा बुक्स, पुणे.

६) ''सिध्दार्थ जातक, खंड-४'', (जानेवारी, १९९७), संपादिका- भागवत दुर्गा, वरदा बुक्स, पुणे.

७) T. W. Rhys Davids, (2008), *"Buddhist Indi"*, MotilalBanarasidass, Delhi.

८) KhongchindaPhramahachanya, (1986-88), 'The Buddha's Socio-Political Ideas', Ph. D. thesis submitted to Banaras Hindu University.

९) कसबे रावसाहेब, (डिसेंबर, २००८), ''मानव आणि धर्मचिंतन'', सुगावा प्रकाशन, पुणे.

१०) कोसंबी धर्मानंद (१९४०), ''भगवान बुद्ध-पूर्वार्ध'', सुविचार प्रकाशन मंडळ, लिमिटेड, नागपूर.

११) कोसंबी धर्मानंद (जूलै, २००७), ''बौद्ध संघाचा परिचय'', कौशल्य प्रकाशन, औरंगाबाद.

१२) कोसंबी धर्मानंद (२००७), ''बुद्धलीला'', महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई

१३) परांजपे बिंदा (जुलै, २०१०), ''प्राचीन भारतीय इतिहास'', लोकवाड्.मय गृह, मुंबई

१४) राजवाडे वि. का., (मे, २००७), ''भारतीय विवाहसंस्थेचा इतिहास'', लोकवाङ्‌मयगृह, मुंबई

१५) रायचौधुरी हेमचंद्र (१९७२), ''प्राचीन भारताचा राजकीय इतिहास'', डायमंड पब्लिकेशन्स, पुणे.

१६) जोशी लक्ष्मणशास्त्री, (संपा.)(१९९५), ''मराठी विश्वकोष, खंड-१५'', महाराष्ट्र राज्य विश्वकोष निर्मिती मंडळ, मुंबई